# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती-४४४ ६०४

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

" Towords Global Technological Excellence "

दु.क्र (०७२१)२५३१९२९/३० | फॅक्स- (०७२१) २५३१९३१

वेबसाईट : www.gcoea.ac.in | ई मेल : principal@gcoea.ac.in


सुचना

जा.क्र.शाअमअ/२१/शि.वि/ १०१३
दिनांक :- १/३/२०२१

विषय :- सर्व प्रवर्गाच्या शिष्यवृत्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज www.mahadbtmahait..gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन भरुन सादर करणेबाबत

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.शाअमअ/२०/शि.वि./३३९९ ते ४००३ दिनांक ०५/१२/२०२०
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.शाअमअ/२१/शि.वि./२८६ दिनांक १८/०१/२०२१
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.शाअमअ/२१/शि.वि./५५६ दिनांक ०२/०२/२०२१
४. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/महाडिबीटी/२०२१/४७३ दिनांक :- ०१/०३/२०२१

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ला या महाविद्यालयामध्ये प्रथम, व्दितीय, तृतीय, तसेच चतुर्थ वर्ष बि.टेक व प्रथम व व्दितीय वर्ष एम. टेक. प्रवेशित सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना संदर्भिय पत्र क्र.१ ते ३ अन्वये या अगोदर कळविण्यात आले होते की, सर्व विद्यार्थ्यांनी **दिनांक २०/०२/२०२१ पुर्वि** शिष्यवृत्तीचे अर्ज www.mahadbtmahait.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन रित्या भरुन सादर करावे, परंतु दिनांक २०/०२/२०२१ पर्यत महाविद्यालयामधील काही विद्यार्थ्यांनी अद्यापर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन रित्या सादर न केल्याचे महाविद्यालयाच्या निदर्शनास आले आहे, सदरची बाब गंभिर स्वरुपाची असुन, शिष्यवृत्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज सादर न केल्यास अशा सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडुन खुल्या प्रवर्गाचे शुल्क आकारण्यात येईल याविषयी विद्यार्थ्यांना अगोदरच अवगत करण्यात आले आहे.

तसेच संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये मा. सहसंचालक कार्यालयाकडुन दिनांक ०५/०३/२०२१ पुर्वि अर्जांची तपासणी करण्याचे कळविले आहे, तरी सर्व प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना एक शेवटची संधी म्हणुन शिष्यवृत्तीचे अर्ज www.mahadbtmahait..gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन रित्या भरुन सादर करण्याकरिता **दिनांक ०५/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे, जे विद्यार्थी दिनांक ०५/०३/२०२१ पुर्वि शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करणार नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांकडुन खुल्या प्रवर्गाचे शुल्क वसुल करण्यात येईल, याची विद्यार्थी तसेच पालकांनी नोद घ्यावी.** शिष्यवृत्ती योजनेसंबंधी अधिक माहिती करीता www.mahadbtmahait.gov.in या वेबपोर्टलवर भेट दयावी.

**महत्वाच्या सुचना :-**

**१.ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज तृटी मुळे परत करण्यात (Send Back To Applicant) आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ दुरुस्ती करुन अर्ज पुन्हा सादर करावे, अर्जातील चुकांची पुर्तता करुन पुन्हा सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.**

**२. संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश Against CAP अंतर्गत झालेले आहेत असे विद्यार्थी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वस्तीगृह योजना याकरिता अपात्र असतील.**

**३.सर्व सुचना वेळोवळी मिळण्याकरीता सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपआपल्या प्रवर्गनिहाय महाविद्यालयातर्फे तयार करण्यात आलेल्या Whats app group मध्ये सहभागी व्हावे.**

**ज्या विद्यार्थ्यांनी फी सवलत घेवुन महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी सुचना लागल्यानंतर विहीत मुदतीत फी सवलतीचे अर्ज सुचनेप्रमाणे भरुन सादर करावयाचे आहेत. जे विद्यार्थी दिलेल्या मुदतीत/सुचनेप्रमाणे अर्ज भरणार नाही अशा विद्यार्थ्यांना नियमानुसार असलेले पुर्ण शुल्क भरावे लागेल. तसेच विहीत मुदतीत फी सवलतीचे अर्ज दाखल केलेले असले तरी संबंधीत विभागामार्फत शिष्यवृत्ती/फ्रिशीप मंजुर न झाल्यास त्यासंबंधात महाविद्यालयाकडुन घेण्यात आलेला निर्णय त्या विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. (उदा. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० करिता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरुपात प्राप्त होणारे इतर शुल्क अद्यापर्यत महाविद्यालयाला प्राप्त झाले नाही, त्यामुळे सदरची रक्कम विद्यार्थ्यांकडुन वसुल करण्याचा निर्णय महाविद्यालयीन प्रशासनाने घेतल्यास तो विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील) तसेच शिक्षणशुल्क प्रतिपुर्तीची रक्कम शासन/संबंधित सक्षम विभागाकडुन जेवढी रक्कम मान्य/मंजुर केली जाईल तेवढीच रक्कम विद्यार्थ्यास देय राहील. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी कार्यालयातर्फे लावण्यांत येणा-या सुचनांकरिता सुचनाफलकांचे अवलोकन करावे. तसेच शिष्यवृत्तीच्या अर्जाला अंतीम मान्यता मिळेपर्यत प्रत्येक विद्यार्थ्यांने आपण भरलेल्या अर्जाची सद्यास्थितीची पडताळणी करणे आवश्यक आहे. एखाद्या विद्यार्थ्याचा अर्ज काही तृटी मुळे परत पाठविण्यात आल्यास व सदरचा अर्ज विद्यार्थ्यांने पुन्हा तृटीची पुर्तता करुन सादर न केल्यास शिष्यवृत्ती विषयक होणा-या नुकसानास विद्यार्थी स्वत:हा जबाबदार राहील.**

प्रशासकिय अधिकारी
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
अमरावती

प्रत :- १. डाटा सेंटर, शा. अभि. महाविद्यालय, अमरावती यांना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरिता
२.सर्व विद्यार्थ्यांना सदरची सुचना ही त्यांच्या वर्ग प्रतिनिधींनी Whats app group व्दारे देण्यात यावी.

Govt. College of Engineering
सत्यमेव जयते
AMRAVATI

Scanned by TapScanner